**CNR No. MHDH040003032019**
**नियमित दिवाणी दावा क्र.१६/२०१९**
कमलबाई पंडीत मिस्तरी विरुध्द
दिलीप पंडीत मिस्तरी व अन्य

## निशाणी क्रमांक ५ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे दाव्याचा अंतिम निर्णय होईपावेतो तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी नि. १० वर त्यांचा खुलासा दाखल केलेला आहे.

२. अर्ज व खुलाशाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींच्या वकीलांचे युक्तीवाद ऐकले. वादी व प्रतिवादींच्या परस्पर विरोधी कथनांवरुन खालील प्रश्न काढलेले असुन त्यावरील निष्कर्ष त्या खालील कारणमिमांसेच्या आधारे नोंदविलेले आहेत.

| | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीने असे शाबीत केले काय की, तीच्या म्हणण्यात प्रथमदर्शनी तथ्य आहे ? | होय. |
| २. | वादीने पुढे असे शाबीत केले काय की, न्यायाचा समतोल तीच्या बाजुने आहे ? | होय. |
| ३. | वादीने पुढे असे शाबीत केले काय की, अर्ज मंजुर न केल्यास तीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल ? | होय. |
| ४. | आदेश काय ? | अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

**प्रश्न क्रमांक १ ते ३ करिताः –**

३. वादीने सदर दाव्यातील कथन व मागणीच्या पृष्टयर्थ दावा मिळकत शेत गट नं. ४२४ चा खातेउतारा व ७/१२ उतारा व ग्रामपंचायत घर क्र. ५३४ चा उतारा (यापुढे या मिळकतींना "दावा मिळकती" म्हणुन संबोधण्यात येईल) अशी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. याउलट प्रतिवादींनी त्यांच्या वडीलांच्या सेवा पुस्तीकेचा दाखला, मौजे खर्दे बु. ता.

शिंदखेडा येथील फेरफार नोंद क्र. ३८७ ची प्रत अशी कागादपत्रे दाखल केलेले आहेत.

४. वादीच्या कथनाप्रमाणे दावा मिळकत ही वादीच्या वडीलांकडुन मिळालेली वडीलोपार्जीत मिळकत असुन ती महसुल दप्तरी वादीच्याच नावावर आहे व वादी निम बटाईने खेडुन अथवा जपुने देवुन येणाऱ्या उत्पन्नावर उदरनिर्वाह करते. याउलट प्रतिवादी यांच्या कथनाप्रमाणे दावा मिळकत ही प्रतिवादी क्र. १ यांचे वडीलांनी संयुक्त नावावरील शेतजमीनी विक्री करुन त्यातुन मिळालेल्या पैशांनी व नोकरीतुन मिळालेल्या रक्कमेतुन वादीचे वडील रघुनाथ सुतार यांचेकडुन दिनांक १६.०८.१९८८ रोजी नोंदणीकृत खरेदीखताने दावा शेत मिळकत विकत घेतलेली आहे. तसेच खर्दे शिवारातील पडीत जागा व जुनी घर मिळकत ही व्दारकाबाई दौलत मिस्तरी व चांभार यांच्याकडुन विकत घेतली आहे.

५. अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने दाखल केलेल्या दावा मिळकत शेत गट नं. ४२४ चा खाते उतारा व ७/१२ व ग्रा.पं. घर क्र. ५३४ चा उताऱ्यांवर वादीच्या नावाची नोंद आहे. तसेच प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे दावा मिळकती हया वादीच्या वडीलांकडुन तिच्या नावावर खरेदी केलेली आहे. यावरुन प्रथमदर्शनी दावा मिळकत शेत व घर हे वादीच्या नावे असल्याचे दिसुन येते.

६. वादीने पुढे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. १ हा मुलगा असुन प्रतिवादी क्र. २ हा तिचा नातु आहे. तसेच प्रतिवादींनी वादीस शिवीगाळ व मारहाण करुन राहत्या घरातुन हाकलुन लावल्यामुळे तीस तीच्या मुलीच्या व जावयाच्या घरी आश्रयीतांसारखे जीवन जगावे लागत आहे. तसेच दाव्यातील घर हे वादीस राहण्यासाठी एकमेव साधन असुन दाव्यातील शेतजमीन ही वादी निम बटाईने खेडुन अथवा जपुने देवुन येणाऱ्या उत्पन्नावर उदरनिर्वाह करते. याउलट प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे वादी व तीचे पती हे प्रतिवादी क्र. १ मुलाकडेच राहत होते व प्रतिवादी क्र. १ हा दावा शेतमिळकत खेडुन त्यातुन येणारे उत्पन्न व सुतारी कामातुन दावा घर मिळकत बांधुन वादी व वडील पंडीत यांचा सांभाळ करीत होता.

७. एकंदरीत दोन्ही बाजुंच्या कथनावरुन असे दिसुन येते की, वादी व प्रतिवादी क्र. १ हे दोघेही दावा मिळकत घरात राहत असुन सदर मिळकत त्यांच्या ताब्यात असल्याचे

कथन करीत आहे. तसेच वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादींच्या कृत्यामुळे ती तीच्या मुलीकडे मेहरगांव येथे आश्रयीतांसारखे जीवन जगत आहे. अशा परीस्थीतीत, जरी वादी व प्रतिवादी हे दावा मिळकत घरात राहत असुन ते त्यांच्या ताब्यात असलयाचे कथन करीत असले तरी वादीच्या कथनाप्रमाणे ती आजरोजी दावा मिळकत घरात राहत नसुन ती मुलीकडे राहत आहे. याउलट वादीने प्रतिवादी हे दावा मिळकत घरात राहत नसलेबाबत कोठेही स्पष्टपणे नमुद केलेले नाही. त्यामुळे आजरोजी दावा मिळकत घर हे प्रतिवादी यांच्या कब्जेउपभोगात असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते.

८. याव्यतिरिक्त, वादीच्या कथनाप्रमाणे दावा मिळकत शेतजमीन ही तिच्या ताब्यात असुन ती निमबटाईने खेडुन उत्पन्न घेत आहे. याउलट प्रतिवादींनी दावा मिळकत शेतजमीन ही त्यांच्या ताब्यात असल्याचे कथन केले आहे. वादीने दावा मिळकत शेतजमीनीवर तीचा ताबा दाखविण्याकरिता खाते उतारा व ७/१२ उतारा दाखल केलेला आहे. त्यावरुन महसुल दप्तरी दावा मिळकत शेत हे वादीच्या नावे असुन प्रथमदर्शनी तीच्या ताब्यात असल्याचे दिसुन येते. याउलट प्रतिवादींनी दावा मिळकत शेतजमीन ही त्यांच्या वडीलांनी वडीलोपार्जीत जमीनी विकुन व नोकरीच्या पैशातुन वादीच्या नावे विकत घेतली असल्याचे कथन केले आहे. परंतु आजरोजी दावा मिळकत शेतजमीन ही त्यांच्या ताब्यात असल्याचे दर्शविण्याकरीता कोणताही ठोस पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही.

९. प्रस्तुतचा अर्ज निकाली काढतांना प्रथमदर्शनी संपुर्ण दावा मिळकत ही वादीच्या ताब्यात आहे अथवा कसे हे पाहणे जरुरीचे असते आणि जर सदर दावा मिळकत ही वादीचे ताब्यात असल्यास व त्याच्या ताब्यास प्रतिवादी हरकत अडथळा करीत असल्यास केवळ तेव्हाच वादीस तीने मागणी केल्याप्रमाणे मनाईहुकुम देता येवु शकतो. परंतु वादीचे कथन व दाखल केलेले कागदपत्रे आणि वर नमुद विवांचनेवरुन प्रथमदर्शनी वादीचा ताबा हा केवळ दावा मिळकत शेत जमीनीवर असल्याचे दिसुन येत असुन घर मिळकत ही प्रतिवादी यांच्या ताब्यात असल्याचे दिसुन येते. त्यामुळे याठिकाणी हे पाहणे आवश्यक आहे की, वादीच्या दावा मिळकत शेतजमीनीवर असलेल्या ताब्यास प्रतिवादींनी हरकत अडथळा निर्माण केला अथवा कसे.

१०. वादीच्या कथनाप्रमाणे वादी ही दावा मिळकत शेतजमीन निमबटाईने खेडत असुन दिनांक ०६.०६.२०१९ रोजी ती सदर शेतजमीनीत गेली असता प्रतिवादींनी तीला शिवीगाळ करुन धक्काबुक्की केली आणि शेतात पाय ठेवला तर जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली. सदर कथनास पुरक असा पुरावा वादीने दिलेला नसला तरी प्रतिवादींनी त्यांच्या कथनामध्ये दिनांक ०७.०६.२०१९ रोजी वादी व त्यांच्यामध्ये वाद झाल्याचे कथन केले आहे. यावरुन प्रथमदर्शनी वादी व प्रतिवादींमध्ये दावा मिळकत शेतजमीनीच्या ताब्यावरुन वाद झाल्याचे दिसुन येते. त्यामुळे ज्याठिकाणी दावा मिळकत ही प्रथमदर्शनी वादीच्या कब्जेउपभोगात असल्याचे दिसुन येत असतांना सदर ताब्याबाबत प्रतिवादी व वादीमध्ये वाद झाल्याने वादीच्या कब्जेउपभोगास हरकत अडथळा झाल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते.

११. दोन्ही बाजूंच्या कथनावरून आणि दाखल कागदपत्रांवरुन केवळ दावा मिळकत शेतजमीन ही वादीच्या कब्जेउपभोगात असुन प्रतिवादींनी तीच्या कब्जेउपभोगास हरकत अडथळा केल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. त्यामुळे त्यापुरते वादीच्या कथनामध्ये प्रथमदर्शनी तथ्य असल्याचे दिसून येते. प्रस्तुत दाव्याच्या अंतीम निकालास अवधी लागणार असल्याने तोपर्यत जर वादीनी कथन केल्याप्रमाणे प्रतिवादींना सदर हरकत अडथळा करण्यास प्रतिबंध न केल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. याउलट, जर मनाई हुकुम दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. म्हणून माझे मते न्यायिक समतोल हा केवळ दावा मिळकत शेतजमीन बाबत वादीच्या लाभात आहे. सबब मी प्रश्न क्र.१ ते ३ चे उत्तर त्यानुसार देत आहे.

<u>प्रश्न क्रमांक ४ करिताः</u>-

१२. प्रश्न क्र.१ ते ३ चे निष्कर्षाचा व वरील सर्व कारणांचा विचार करता वादीची तुर्तातुर्त मनाई हुकुमाची मागणी ही केवळ दावा मिळकत शेत जमीन बाबत मंजुर होण्यास पात्र असुन दावा मिळकत घराबाबत त्याप्रकारचा मनाई हुकुम मिळण्यास वादी पात्र नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजुर होण्यास पात्र आहे. करिता प्रश्न क्रमांक ४ चा निष्कर्ष नोंदविण्यासाठी मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादींनी वादीच्या दावा मिळकत शेत जमीन जी दाव्याच्या परीच्छेद क्र. २ मध्ये नमुद आहे तीच्या शांतामय कब्जे उपभोगास दाव्याचा निकाल लागेपर्यत हरकत अडथळा करु नये असे आदेशीत करण्यात येते.

३. अर्जाचा खर्च दाव्याच्या खर्चात समाविष्ट करण्यात यावा.

Digitally signed by SUJIT AMBADAS RATHOD
Date: 2022.01.21 12:42:48 +0530

( एस. ए. राठोड )

दिनांक – २१.०१.२०२२ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, दोंडाईचा.

<u>प्रमाणपत्र</u>

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकूरातील शब्द न् शब्द मूळ आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव - बी.एन. थोरात
न्यायालयाचे नांव - न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग-१, दोंडाईचा
पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. - २१.०१.२०२२

स्वाक्षरित/-
लघुलेखक.